Join @sushilsirsatofficial

महाराष्ट्र शासन
वन विभाग

**वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय**

(नवीन प्रशासकीय इमारत, शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, नागपूर ४४० ००१.)
email id : recruitment2023.nagpurcircle@gmail.com

# वनरक्षक (गट क) पदभरती प्रकिया -2023

## धाव चाचणीबाबत सुधारीत जाहीर सुचना

नागपूर वनवृत्तातील वनरक्षक पदाकरिता धाव चाचणीचा कार्यक्रम महिला व पुरुष उमेदवार यांचे करीता दिनांक 21.02.2024 ते 26.02.2024 या कालावधीत मिहान नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. दि.21.02.2024 रोजी तांत्रिक कारणामुळे धाव चाचणीच्या बॅचेस नियोजित वेळी सुरु करणे शक्य झाले नाही. त्यामुळे दि.21.02.2024 रोजी जे उमेदवार धावु शकले नाही, अशा उमेदवारांना त्याच दिवशी सायंकाळी दि.22.02.2024 किंवा दि.26.02.2024 रोजी सकाळच्या बॅच मध्ये धावता येईल असे समक्ष सांगण्यात आले होते. सोबतच सदर उमेदवारांना ई-मेलव्दारे सुध्दा वैयक्तीकरित्या कळविण्यात आले होते. दि.21.02.2024 रोजीचे काही उमेदवार दि.22.02.2024 रोजी उपस्थित झाल्याने दि.22.02.2024 रोजीची नियोजित बॅच सुध्दा उशिरा सोडण्यात आली. या कारणास्तव बऱ्याच उमेदवारांकडुन नियोजित बॅच ही दिलेल्या वेळेत सोडण्यात न आल्याने क्षमतेनुसार धावता आले नाही, अशा प्रकारच्या तक्रारी करुन पुन:श्च धाव चाचणी घेण्याची बऱ्याच उमेदवारांनी विनंती केली आहे. या व्यतिरिक्त दि.23.02.2024 ते 26.02.2024 या कालावधीचा धावचाचणीचा कार्यक्रम नियोजित वेळेत पार पडला आहे.

*त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता दि.21.02.2024 व 22.02.2024 रोजी धाव चाचणी मध्ये भाग घेतलेल्या ज्या महिला/पुरुष उमेदवारांची बॅच उशीरा सोडण्यात आल्याने त्यांचे धाव चाचणीवर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे व ते स्वत:हुन धाव चाचणीत पुन:श्च सहभागी होवु इच्छितात अशा सर्व महिला/पुरुष उमेदवारांना* ***पुन:श्च धाव चाचणी ची संधी देण्यात येत आहे.*** *सदरची संधी ही खालील अटी व शर्ती नुसार अनुज्ञेय आहे.*

1. दि.21.02.2024 व 22.02.2024 रोजीचे जे उमेदवार पुन:श्च धाव चाचणीत सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी दि.01.03.2024 रोजी रात्री 12.00 वाजेपर्यंत recruitment2023.nagpurcircle@gmail.com या ई-मेलवर आपली सहमती नोंदविणे अनिवार्य राहील. त्यांचा सुधारीत धाव चाचणीचा कार्यक्रम दि.04.03.2024 रोजी घेण्यात येईल. दि.02.03.2024 व तदनंतर प्राप्त होणाऱ्या ई-मेल बाबत कुठलाही विचार केला जाणार नाही. धाव चाचणीस येतांना ऑनलाईन परिक्षेचे ओळखपत्र सोबत घेऊन येणे आवश्यक राहील.
2. जे महिला/पुरुष उमेदवार सुधारीत धाव चाचणीत सहभागी होवुन धावचाचणी पुर्ण करतील त्यांचा सुधारीत धाव चाचणी पुर्ण केल्याचा वेळ अंतिम निकालासाठी ग्राहय धरण्यात येईल. (दि.21.02.24 व 22.02.24 या दिवशीचा धाव चाचणीच्या वेळेचा विचार केला जाणार नाही. अशा आशयाचे बंधपत्र देणे उमेदवाराला आवश्यक राहील)
3. जे उमेदवार या सुधारीत धाव चाचणीच्या कार्यक्रमास इच्छुक नाहीत,अशा उमेदवारांची दि.21.02.24 व 22.02.24 या दिवशीच्या धाव चाचणीची वेळ अंतिम निकालासाठी ग्राहय धरण्यात येईल.
4. दि.23.02.2024 ते 26.02.2024 या कालावधीत धाव चाचणीचा कार्यक्रम विहीत वेळेत पार पडला असल्याने सदर कालावधीतील महिला/पुरुष उमेदवारांना सुधारीत धाव चाचणी कार्यक्रमात भाग घेता येणार नाही.
5. दि.21.02.2024 ते 26.02.2024 या कालावधीत महिला/पुरुष उमेदवार धाव चाचणीकरीता गैरहजर होते, अशा उमेदवारांना सुधारीत धाव चाचणीच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी संधी देण्यात येत आहे. अशा गैरहजर उमेदवारांनी इच्छुक असल्यास दि.01.03.2024 रोजी रात्री 12.00 वाजेपर्यंत recruitment2023.nagpurcircle@gmail.com या ई-मेलवर तसे कळविणे अनिवार्य आहे. दि.02.03.2024 व तदनंतर प्राप्त होणाऱ्या ई-मेल बाबत कुठलाही विचार केला जाणार नाही. त्यांचा सुधारीत धाव चाचणीचा कार्यक्रम

(वनसंरक्षक, नागपूर वनवृत्त, नागपूर ★ पदभरती-2023 ★)



११०

Join @sushilsirsatofficial

दि.04.03.2024 रोजी घेण्यात येईल. धाव चाचणीस येतांना ऑनलाईन परिक्षेचे ओळखपत्र तसेच विभागाने दिलेले पात्र प्रमाणपत्र सोबत घेऊन येणे आवश्यक राहील.

6. जाहीरातीमध्ये नमुद केल्यानुसार उमेदवारांना धाव चाचणी करीता कोणत्याही प्रकारचा भत्ता व प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.
7. उमेदवाराने ई-मेल करताना आपले नाव, गुणवत्ता क्रमांक ,चेस्ट क्रमांक, FOG क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.
8. जे उमेदवार recruitment2023.nagpurcircle@gmail.com या ई-मेल वर संपर्क साधाणार नाहीत किंवा इच्छुक असल्याबाबत कळविणार नाही अशा उमेदवारांना वेळेवर धाव चाचणीत सहभागी करुन घेतले जाणार नाही .
9. जे उमेदवार मिहान सेझ, परिसर वर्धा रोड, नागपूर येथे सुरु असलेल्या धाव चाचणीत ई-मेल न करता उपस्थित होतील अशा उमेदवारांची नोंद घेतल्या जाणार नाही.

सुधारीत धाव चाचणीचा कार्यक्रम मिहान सेझ परिसर, वर्धा रोड, नागपूर येथे घेण्यात येणार आहे.

| **धाव चाचणीचेस्थळ/ठिकाण** | **धाव चाचणीचे लोकेशन QR** |
|---|---|
| **महिला उमेदवार (3 कि.मी.)** | |
| मौजाकलकुही, लुपीन चौक, मिहान, नागपूर | Female Running track |
| **पुरुष उमेदवार (5 कि.मी.)** | |
| मौजातेल्हारा, वॉटर टँक रोड, मिहान, नागपूर | Male candidate track location |

सदरहु कार्यक्रमातील बदल/सुचनांसाठी उमेदवारांनी वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर वारंवार भेट द्यावी व वैयक्तीक ई-मेल तपासत राहावे. यानंतर कोणत्याही उमेदवारांना धाव चाचणी करीता पुन:श्च संधी दिली जाणार नाही याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

नागपूर

दिनांक : 28.02.2024

(डॉ.भारत सिंह हाडा)
सदस्य सचिव तथा
उपवनसंरक्षक
नागपूर वनविभाग नागपूर